‘कृषी’चा प्राथमिक अहवाल ‘शिक्षण’ विभागाने स्वीकारला

# शालेय अभ्यासात आता शेतीचे धडे

सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. २५ : शालेय अभ्यासक्रमात कृषी विषयाचा समावेश करण्याबाबतचा कृषी विभागाचा प्राथमिक अहवाल शिक्षण विभागाने स्वीकारला असून अभ्यासाचा आराखडा तयार करण्यासाठी लवकरच तज्ज्ञांची समिती नेमून तो निश्चित करण्यात येणार आहे. राज्याचे कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी यासंदर्भातील अहवाल शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे सोपविला आहे. “ कृषी केंद्रित आशयामुळे शेतीचा अभ्यास होणार असून शेतीकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढेल तसेच शेती व हा व्यवसाय करणाऱ्यांबद्दल संवेदनशीलता निर्माण होईल. ” असा विश्वास मंत्री सत्तार यांनी व्यक्त केला.

कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शालेय शिक्षण विभागाचे सहसचिव ई. मु. काझी, सहसचिव (कृषी) बाळासाहेब रासकर, कृषी आयुक्त सुनील चव्हाण, महाराष्ट्र राज्य कृषी परिषदेचे महासंचालक रावसाहेब भागडे, कृषी संचालक (शिक्षण) प्रा. डॉ. उत्तम कदम, संचालक (संशोधन) डॉ. हरिहर कौसडीकर, अवर सचिव उमेश चांदिवडे आदींची यावेळी उपस्थिती होती.

## सर्वांगीण विकासावर भर

शालेय अभ्यासक्रमातील इतर सर्व विषयांच्या सहसंबंधातून शेतीचे महत्त्व, उपाययोजना, व्यवसाय संधी, शेतीविषयक जाणीव अशा अनेक पैलूंवर लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे शक्य होईल, असा विश्वास मंत्री सत्तार यांनी व्यक्त केला. अभ्यासाचा आराखडा तयार करताना विद्यार्थ्यांना त्यांच्यात या विषयाबाबत रुची कशी निर्माण होईल याची काळजी घेण्यात आली आहे, असे केसरकर यांनी सांगितले. "महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषद आणि कृषी परिषद यांनी तज्ज्ञ समिती नेमून आराखडा तयार करावा, असेही केसरकर म्हणाले.



## कृषी विभाग साहित्य पुरविणार

“शालेय विद्यार्थ्यांना लहानपणापासून शेतीविषयक ज्ञान मिळाले तर पुढील जीवनात त्यांना त्याचे महत्त्व समजू शकेल. कृषी शिक्षणविषयक एकात्मिक आराखडा तयार करताना इयत्ता पहिली ते पाचवी, सहावी ते आठवी आणि नववी ते दहावी अशा पद्धतीने अभ्यासक्रम ठेवावा. कृषी विषयक प्रशिक्षणासाठी जे जे साहित्य आणि मदत लागेल, ते पुरविण्याची कृषी विभागाची भूमिका आहे.” असे सत्तार यांनी सांगितले.